INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 7 | AUGUST – 2025

‘भोगवटा’ : संघर्ष, स्वाभिमान आणि जिद्दीची जीवनगाथा

डॉ. कैलास अंभुरे
संचालक, विद्यार्थी विकास/ मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

सारांश :

सुदाम मगर यांच्या ‘भोगवटा’ हे आत्मकथन मराठवाड्यातील ग्रामीण आणि दलित जीवनाचा, विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळातील भीषण दारिद्र्य, भूक, १९७२ चा दुष्काळ आणि अस्पृश्यतेच्या दाहकतेचा जिवंत दस्तऐवज आहे. लेखकाच्या आईचा—’सखुबाई’चा कष्टप्रद आणि स्वाभिमानी जीवनप्रवास या आत्मकथनाचा मुख्य कणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन सुदाम मगर यांनी बालपण, शिक्षण, प्रेमभंग, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि उपजीविकेसाठी वेटर ते रिक्षाचालकापर्यंतचा खडतर प्रवास अनुभवला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही दयेची भीक न मागता, शिक्षणाच्या व आत्मपरीक्षणाच्या बळावर स्वाभिमानाने उभे राहण्याची जिद्द ‘भोगवटा’मध्ये दिसते. दु:ख व वेदनांचे भांडवल न करता, विद्रोही तरीही संयमित आणि मिश्किल शैलीत मांडलेली ही एका सामान्य माणसाची असामान्य आणि प्रेरक जीवनगाथा आहे. मराठवाडी बोलीभाषेतील सहजता, चित्रदर्शी निवेदनशैली आणि आत्मपरीक्षणात्मक प्रामाणिकपणा हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य अधोरेखित केले आहे. दु:खाचे भांडवल न करता स्वाभिमानाने उभे राहण्याची वृत्ती, तसेच सामाजिक विषमतेवरील मार्मिक भाष्य यामुळे ‘भोगवटा’ हे केवळ वैयक्तिक दु:खकथा न राहता सामाजिक दस्तावेज ठरते.

मुख्य शब्द : भोगवटा, सुदाम मगर, दलित साहित्य, दलित आत्मकथन, मराठवाडा, आंबेडकरी चळवळ, अस्पृश्यता, स्वाभिमान, संघर्ष, जातीयता व अस्पृश्यता, ग्रामीण जीवन, दारिद्र्य, आत्मभान, मराठवाडी बोलीभाषा इत्यादी.

मध्ययुगीन काळापासून मराठवाड्याच्या मातीने मराठी साहित्याची भूमी समृद्ध केलेली आहे. याच मातीतून मिलिंद महाविद्यालयाच्या वार्षिकांकातून प्रथमत: दलित आत्मकथन लेखनास प्रारंभ झाला (१९६४). प्र. ई. सोनकांबळे यांच्या ‘आठवणींचे पक्षी’ (१९७९) पासून ते ना. तु.पोघे यांच्या ‘इरवाड’पर्यंत विविध दलित आत्मकथनांनी मराठी साहित्यविश्वाचा परीघ विस्तारला आहे. यामध्ये ‘मरणकळा’- जनाबाई गिऱ्हे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. याच परंपरेत सुदाम मगर यांचे ‘भोगवटा’ (ऑगस्ट २०१७) हे आत्मकथन येते. “माय! हा शब्दप्रपंच तुझ्या अस्तित्वमुळेच माझ्या हुंकारात आला…!” हा या आत्मकथनाचा उपोद्घात लेखकाच्या जाणीवेसह आत्मभान दर्शवतो. खरे तर, ‘भोगवटा’ हा केवळ शब्दप्रपंच नाही, तर तो तळागाळातील पिडलेल्या माणसाचा ‘हुंकार’ आहे. हा हुंकार मायच्या परिश्रमामुळे लेखकामध्ये आला. हा हुंकार केवळ प्रतिसाद नाही, तर तो उद्गार आहे. समाजव्यवस्थेत केलेला हस्तक्षेप आहे. या उद्गाराचा उगम माय जरी असली तरी त्याचे नाते “जातिअंताच्या लढ्यासाठी आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून देणाऱ्या मराठवाड्यातील तत्कालीन अस्पृश्य व अस्पृश्योतर झुंजार सेनानींना…!” या अर्पणपत्रिकेशी आहे. म्हणजेच जातिअंत, आंबेडकरी चळवळ आणि अस्पृश्य व अस्पृश्योतर झुंजार सेनानींशी आहे. त्यामुळे मराठी आत्मकथनांमध्ये दलित चळवळीच्या पार्श्वभूमीवर उदयाला आलेल्या आत्मकथनांनी

जी एक स्वतंत्र परंपरा निर्माण केली आहे, त्या परंपरेत 'भोगवटा' हे आत्मकथन दखलपात्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रबोधित झालेल्या लेखकांनी आपले दु:ख, वेदना, अपमान, अन्याय, संघर्ष आणि जातीयतेचे चटके अनुभवले, समाज आणि समाजव्यवस्थेवर असूड ओढत नव्या आशेने स्वत:सह कौटुंबिक जीवन साकारत स्वत:ला स्वाभिमानाने उभे केले अशा लेखक परंपरेतील एक नाव म्हणजे सुदाम मगर होय.

सुदाम मगर यांच्या वाट्याला 'भोगवटा' का? तर याचे साधे, सरळ आणि थेट उत्तर म्हणजे येथील धर्मसत्ता, समाजसत्ता आणि राजसत्तांनी अनादीकाळापासून एक प्रारूप तयार करून त्या पायवाटेवरून सर्वांना चालायला भाग पाडले. या सत्तांनी अनेक जाती हीन मानल्या, त्यांच्या वाट्याला लांछनास्पद जगणे आणले. अशाच महार म्हणवल्या जातीच्या माय-बापापोटी त्यांचा जन्म झाला म्हणून 'भोगवटा'. या देशातल्या माणसांवर जन्मताच जातीचा अदृश्य शिक्का मारलेला असतो. हिंदू धर्मात तर तो शिक्का पुसून दुसऱ्या जातीचा शिक्का उठवून घेण्याची कोणत्याही देवाचीसुद्धा प्राज्ञा नाही. या व्यवस्थेत साळ्याला माळी होता येत नाही. शुद्रांना वैश्य होता येत नाही आणि वैश्यांना शुद्रही होता येत नाही आणि क्षत्रियांना ब्राह्मण होता येत नाही. म्हणजेच जन्मत:च ज्याच्या अंगावर 'अस्पृश्य' ही मुद्रा चिकटली ती मरेपर्यंत तर कायम असतेच; पण मेल्यानंतरही कायम राहते. ती पुसायचा एकमेव मार्ग म्हणजे हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्म स्वीकारणे; ख्रिश्चन धर्म स्वीकारणे होय; पण तरीही समाज 'ख्रिश्चन महार'सारख्या शिक्क्यांनीच त्यांना ओळखतो. अस्पृश्य जातीच्या माय-बापापोटी जन्माला यायचा अपघात घडला की सारे संपलेच. ते जीवन किडामुंगीसारखे कसे जगावे लागते आणि ते जगावे लागणाऱ्या जिवाला जर शिक्षण, बुद्धिमत्ता आणि संवेदनशील मन लाभलेले असेल तर त्याचा रोजचा श्वाससुद्धा प्राणघातक विषारी वायूसारखा असह्य कसा होतो, याची समर्थ चित्रे सुदाम मगर यांच्या 'भोगवटा' या आत्मकथनाच्या पानापानांवर आढळतात.

लेखकाच्या निवेदनानुसार 'भोगवटा' हे आत्मकथनाचे शीर्षक त्याचे मित्र, प्रख्यात लेखक योगिराज बागूल यांनी सुचवले. 'भोगवटा' या शीर्षकातच आत्मकथनाचा आशय दडलेला आहे. 'भोगवटा'चा शब्दश: अर्थ भोगणे, उपभोग, वापर, कब्जा आहे. येथे 'भोगवटा' हे शीर्षक समर्पक वाटते. कारण भारतीय व्यवस्थेने अस्पृश्य म्हणवल्या गेलेल्या जातींच्या वाट्याला भोग आणले, त्यांचा श्रमासह देहिक उपभोग घेतला, त्यांचा पाहिजे तसा वापर करून घेतला. एवढेच नाही, तर त्यांच्यावर कब्जाही केला. 'भोगवटा' म्हणजे नशिबी आलेल्या सुख-दु:खांचा स्वीकार, जीवनाने दिलेल्या यातना, संघर्ष आणि त्यातून घडलेली जाणीव. दारिद्र्य, सामाजिक विषमता, उपेक्षा, श्रम, अपमान आणि अस्तित्वासाठीची झुंज यांचे अनेक पदर या पुस्तकात दिसून येतातच; त्यापलीकडे जाऊन भोगणे, सहन करणे, आणि तरीही स्वाभिमानाने उभे राहणे हे 'भोगवटा'चे मूळ सूत्र आहे.

लेखक सुदाम मगर' याच्या वाट्याला आलेला दु:खाचा भोगवटा भारतीय समाजव्यवस्थेने त्याच्या जन्मबरोबरच त्याच्या पदरात बांधला, नव्हे तर पाचवीला पुजला. त्यामुळे सुखाच्या क्षणीही सुदामला सुखासीन होऊ न देता, सतत हा भोगवटा बोचत राहतो. नायकाला अस्वस्थ करणारा आतला केवळ आवाज नाही तर तो आक्रोश आहे. तो सत्य सांगून भार हलका करू पाहतो; पण तो हलका होत नाही ही आणखी एक शोकांतिका. खरे तर, प्रत्येक माणसाच्या आयुष्यात सुख-दु:ख, यश-अपयश आणि संघर्ष असतो. आयुष्यातील वेदना, अभाव, अन्याय, अपयश आणि संघर्ष यांचे अनेक रंग असतात. काही माणसे या संघर्षांसमोर हार मानतात, तर काही त्याच संघर्षांना सामर्थ्यात रूपांतरित करतात. सुदाम मगर यांचे 'भोगवटा' हे आत्मकथन अशाच एका सामान्य माणसाच्या असामान्य जीवनप्रवासाची कहाणी आहे. दलित समाजात जन्मलेल्या आणि दारिद्र्य, सामाजिक विषमता व वैयक्तिक अपयशांच्या कचाट्यात सापडलेल्या एका जिद्दी माणसाने जीवनाशी दिलेल्या झुंजीचीही कथा आहे.

'भोगवटा' हे आत्मकथन बालपण ⟶ शिक्षण ⟶ प्रेम ⟶ प्रेमभंग ⟶ संघर्ष ⟶ संसार ⟶ व्यवसाय अशा टप्प्यांतून साकारत जाते. ही मांडणी कालक्रमानुसार (chronological) आहे. ही पद्धती पारंपरिक असली तरी हे कथन एकरेषीय नाही. यामध्ये मध्येच भूतकाळ येतो, माय आठवते, गाव आठवते. या Non-linear भावनात्मकतेमुळे आत्मकथनाला अधिक खोली प्राप्त होते. आत्मकथनाच्या शेवटच्या टप्प्यात नायकाच्या सांसारिक जीवनातील सुख, समृद्धता प्रतीत होते. तो दु:खाचे भांडवल करीत नाही, संघर्षाने नामोहरम होत नाही आणि सुखाने माततही नाही, मात्र नायकाचे जगणे आजही बदललेले नाही. "आज मी ५५व्या वर्षाच्या उंबरठ्यावर उभा आहे. कालपर्यंत भाकरीच्या मागे धावत होतो, आज सुखाचे दोन घास मिळत आहेत. मुलगा कुशल मुंबईत एका खासगी कंपनीत अधिकारी आहे. मुलगी भूमिका महाविद्यालयीन शिक्षण घेते आहे. पुष्पायापूर्वीच ट्रेझरी कार्यालयात (औरंगाबाद) अधिकारी म्हणून काम करतेय. मी, सुदाम मगर मात्र अजूनही तोच नि तसाच आहे. माझी रिक्षा आणि मी आजही संपूर्ण औरंगाबादच्या रस्त्यांनी धावतो आहे." (पृ. २१५-२१६)

नायक सुदामच्या जीवनप्रवासाचा प्रारंभ जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील लोणगाव या सात-आठ हजार लोकवस्तीच्या गावापासून होतो. लोणगाव हे सुदामचे जन्मगाव. या गावात मांग, बौद्ध, चांभार, भिल्ल, आतार, सुतार, कासार, सोनार, लोहार, वाणी, ब्राह्मण, मारवाडी, धनगर, कुणबी, मराठा, ठाकूर, माळी, मुसलमान अशा अठरापगड जातीचे लोक राहत. गावाच्या वरल्या बाजूला लेखकाचे घर आणि बाकी गाव खाल्लाकडे (म्हणजे पूर्वेला). आईचे नाव सखुबाई. ती या आत्मकथनाचा आणि लेखकाच्या जगण्याचा कणा. लेखकाच्या जगण्याची उभारणी ज्या अदम्य शक्तीवर झाली, ती शक्ती म्हणजे माय सखुबाई. काका शिवाजी, माय सखुबाई, दादा भीमराव, मित्र डुब्या, पत्नी पुष्पा, प्रेयसी वैशाली, शांताराम, सिद्धार्थ पवार, योगीराज बागुल, बाबुभाई, जयश्री अशा असंख्य माणसांच्या सहवासात सुदाम मगर जीवनप्रवास करतात. या प्रवासात लेखकाचे बालपण, दुष्काळ, विंचू आणि जादूटोणा, कोंबड्या पाळणे, बहिष्काराचा प्रसंग, कुल्फी/आईसकांडीचा प्रसंग, इंदिराबाईकडे शिक्षण, मिरच्या चोरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, बोर्डिंगमधील जीवन, योगिराज बागुल यांच्याशी भेट व साहित्यिक प्रेरणा, तरुणपण, प्रेम आणि वैशाली, मायचा मृत्यू, रिक्षाचालक म्हणून जगण्याचा संघर्ष, पत्नी पुष्पा व तिची पंचवीस वर्षांची नोकरी, मुलगा कुशलची नोकरी, मुलीचे शिक्षण आणि कवी-लेखक-रिक्षाचालक म्हणून जीवनप्रवास असे टप्पे येतात. तसेच नायक सुदाम मगर यांची स्वभिमानी धडपड येते. अगदी ब्रेड विकणे, वेटरचे काम, किराणा दुकान, कुल्फी विक्री आणि अंतिमतः रिक्षा चालवत स्वतः शिकत, आयुष्याशी झुंजत साहित्यिक बनलेल्या लेखकाचा जीवनप्रवास आणि मराठवाड्यातील जालना-औरंगाबाद परिसरातील दलित जीवन येते.

लेखकाचे बालपण जन्मगावी लोणगाव येथे गेल्यामुळे सुरुवातीला मराठवाड्यातील ग्रामीण विशेषत: दलित दारिद्र्याचे जिवंत चित्रण येते. लेखकाच्या जन्मानंतर दुष्काळ पडला होता. येथूनच उपासमारीची, आयुष्याची फरपट सुरु होते. सुकडी (शालेय पोषण आहार) मिळविण्यासाठी शाळेत जाणे, मिळालेल्या सुकडीतल्या पांढऱ्याफटक अळया निवडून सुकडी खाणे, एरंडाच्या बिया खाल्ल्याने विषबाधा होणे, मिलोच्या भाकरी खाणे, तांदूळ कुंद्ग्राची भाजी खाणे, हुलग्याची भाकरी खाणे, दुष्काळात बराशीवर कामासाठी जाणे, बोकडाचं रक्त शिजवून खाणे, खडी फोडणे, शेंगा तोडणे हे सर्व प्रकार गरिबी आणि दुष्काळाची दाहकता दर्शवतात. त्या दिवसांविषयी सुदाम सांगतो, "पोटातली आग विझवण्यासाठी चटणीला ढुसण्या देत भाकर गिळावी लागे. दुपारच्या उन्हात चटणी-भाकरी खाताना जीभ आणि तोंड होरपळून निघे. नाका-डोळ्याला पाणी यायचं. एका हातानं ते पाणी पुशीत भाकर खात असे. कधीकधी हाताचं तिखट नाकाडोळ्याला लागायचं, तवा जीव वेड्यावाणी होई. दुपारच्या कडक उन्हात प्यायचं पाणीही गरम असे. तेच प्यावं लागे. आजूबाजूला सारी अशक्त भणंग माणसं. उघडीबोडखी. उन्हात रापून काळीठिक्कर पडलेली." (पृ. १७). बाहत्तरच्या दुष्काळात मराठवाड्यात सर्वत्र दिसणारं हे सर्वसाधारण चित्र. अशा भीषण दुष्काळात वडिलांशिवाय सुदामचे बालपण गेले. तो कधी लोणगाव खेड्यात तर कधी दरेगावला बहिणीकडे असा लहानाचा मोठा होत गेला. शालेय शिक्षणाविषयी तो म्हणतो, "मला शाळा नको वाटायची. शाळेत जाऊन करणार तरी काय? अभ्यास करावासा वाटत नसे. मी शाळेत जाई. तिथे मिळणाऱ्या सुकडीसाठी." (पृ. १६-१७) भुकेपुढे शिक्षणाची स्वप्ने हरवून गेलेली. "माझ्या पोटात भूक असायची, सुकडी आली की, मला आनंद होई. मी वर्गाच्या दारात बसलेला असे. सुकडी मिळताच मास्तरला चुकांडा देऊन घराकडं धूम ठोकायचो. मला मिळालेल्या सुकडीतल्या पांढऱ्याफटक अळया माय निसायची. तिखट मीठ टाकून त्या सुकडीचा तिखट शिरा करे. मी मिटक्या मारीत खायचो." (पृ. १७) हा प्रसंग शहारे आणतो. सुदामची माय सकुबाई दुष्काळातही हिमतीने उभी राहिली. मजुरीपासून ते खडी फोडण्यापर्यंत सर्व कष्ट तिने सोसले. खडी फोडताना ती त्याला म्हणते, "लहान घास घे." पण सुदाम म्हणतो, "मला कळत नसल्याने मी घावावर घाव घालायचो." (पृ. १७) हे केवळ मगर कुटुंबाचे चित्र नाही तर संपूर्ण दलित-ग्रामीण समाजाच्या उपासमारीचा आलेख आहे. हे चित्रण इतके सूक्ष्म आणि जिवंत आहे की वाचक त्या गल्लीत, त्या परिसरात उभा राहून सर्व अनुभवतो आहे असे वाटते.वेडी बन्नीची माय, विहिरीची भीती, जादू-टोणा, पोट चोळणे, सकुन पाहणे हे सर्व तत्कालीन ग्रामीण जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. या साऱ्या दारिद्र्य, अभाव आणि भेदभावाच्या वातावरणातही नायकाने बालपणातील खेळ, भटकणे, नदीत पोहायला शिकणे यासारख्या गोष्टींचा मनमुराद आनंद घेतला. यामुळे ही केवळ रडकथा होत नाही, तर अभावातही आनंदाचा, सुखाचा शोध घेणारी ही प्रेरक जीवनगाथा होते. येथे ग्रामीण जीवन हे कथनाचा अविभाज्य भाग बनून येते. जांबाच्या नदीवरील घाट, राजवाड्याजवळचे घर, बुधवारचा बाजार, लिंबोळ्या वेचणे, मिरच्या तोडणे, कोंबडी कापणे, मांस खाणे, दादाच्या घरातील भजनाची टिमकी इ. घटना-प्रसंग वाचताना मराठवाड्याच्या ग्रामजीवनाचा एक जिवंत पट डोळ्यांसमोर उभा राहतो. तद्वतच मराठवाड्यातील सांस्कृतिक जीवनाचे अनेक पैलूही उलगडतात. दादाच्या भजनाची परंपरा, राजवाड्यातील भीमगायन कला पथक, लोकगीते, तमाशा, सिनेमाची ओढ, बाजार, सणवार, गुळणा गुळणी, लग्नात नवरा-नवरीने नाव घेणे इत्यादीद्वारे एका काळाचे सांस्कृतिक चित्र समोर येते. उदा. "दसरा असल्याने पोरं सकाळपासूनच कामाला लागली. मी आणि अरुणनेही आपल्या पाट्या कोळशाने घासून धुतल्या कोणी अंघोळी करून फुलं आणायला गेले होते तर कोणी पुस्तकांची जमवाजमव करू

लागले. मी बागेत जाऊन फुले आणली. अरुणने आणि मी सतरंजीवर पुस्तक, पाट्यांची मांडणी केली. सरांनी सांगितलं म्हणून मीही पाटीवर सरस्वती काढली." (पृ. ६९) किंवा ""राजवाड्यात भीमगायन कला पथक होतं. दादा त्याचा मुख्या होता. कोठ्यावरचा भीमराव आणि पंढरी, भिका हे झिलकरी असत. कडुबा सोंगाड्या, गुलबा पण हुन्नरी कलाकार होता. तसेच दामा टेलर नालवादक. दादाचा आवाज मधुर होता, पहाडी होता..." (पृ. ४८) यासारख्या प्रसंग व निवेदनातून कला व सांस्कृतिकपरंपरेचा प्रत्यय येतो. पूर्वी लग्न समारंभात नवरा-नवरीने उखाण्यात नाव घेण्याची प्रथा होती. भिमा दादाचं लग्न झाल्यानंतर वहिणी असाच एक उखाणा घेतात,

"ताड माड रामफळाचं झाड
पंढरपूरचे करते व्यही
चांदीची चौकट, सोन्याचा दरवाजा
उघडून पाहते, आता काय परी
भात अंजरी, भातावर तूप
तुपासारखं रूप, रूपासारखा जोडा
रहायला चिरेबंदी वाडा
बसायला ठायबंदी घोडा
चालण्याचा झोक, कमरंला गोफ
चालणं मोठं ठासून, मला येतं हासू
मी हसले गालात, पुसलं रंगमहालात
अखंडची वस्ती, चौबंदीचा महाल
बुलढाण्याहून जिंकलं देऊळ घाट
देऊळघाटचा अडकित्ता, जालन्याची सुपारी
खरेदी केली औरंगाबादच्या वाण्यानं
औरंगाबादची पिशवी
नगरचे शिंपी, झाले खुशी
नगरची डब्बी, कोकणात गाडी उभी
कोकणचूर डोंगराच्या मधी बाळापूर
बाळापूरचा पेठा, गवारीला पाण्याचा तोटा
वस्तीभरीसाठी आगगाडी फाटी
कमानी दरवाजा त्यावर बसला बगळा
भीमरावचं नाव घ्यायला इळ गेला सगळा." (पृ.८८-८९)

हा एक अतिशय सुंदर, लयबद्ध असा पारंपरिक मराठी उखाणा आहे. पूर्वी आणि काही प्रमाणात आजही लग्नसमारंभ, पूजापाठ किंवा सणासुदीला स्त्रिया आपल्या पतीचे नाव घेण्यासाठी अशा प्रकारच्या दीर्घ, यमक जुळवणाऱ्या आणि वर्णनात्मक उखाण्यांचा वापर करत असत. हे सांस्कृतिक आणि भाषिक संचित आता जवळजवळ लयास जात आहे. (याविषयी लिहिण्याचा मोह टाळता येत नाही.) या उखाण्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात संपूर्ण महाराष्ट्राची सफर घडवली आहे. यामध्येपंढरपूर, बुलढाणा, देऊळघाट, जालना, औरंगाबाद (सध्याचे छत्रपती संभाजीनगर), नगर (अहिल्यानगर), कोकण आणि बाळापूर अशा विविध गाव-शहरांचा उल्लेख आला आहे. त्या काळात कुठल्या गावची कोणती गोष्ट प्रसिद्ध होती, हे यातून समजते. उदा.देऊळघाटचा अडकित्ता आणि जालन्याची सुपारी. व्यापार कसा चालत असे (औरंगाबादच्या वाण्याने खरेदी करणे, नगरच्या शिंप्याने काम करणे) याचे हे एक उत्तम लोकसांस्कृतिक उदाहरण आहे. यातून तत्कालीन समाजजीवनातील प्रतिष्ठेचे आणि श्रीमंतीचे कल्पकतेने वर्णन केले आहे.'चांदीची चौकट, सोन्याचा दरवाजा', 'चिरेबंदी वाडा' आणि 'बसायला ठायबंदी घोडा' या शब्दांतून घराण्याचे मोठेपण दाखवले आहे. तर'भात अंजरी, भातावर तूप' याद्वारे घरातील सुबत्ता आणि संपन्नता दिसून येते. या उखाण्यात पतीपत्नीच्या नात्यातील गोडवा आणि शृंगार अतिशय तरलपणे आला आहे.

'चालण्याचा झोक, कमरंला गोफ' यामधून पतीच्या रुबाबी व्यक्तिमत्त्वाचे आणि देखणेपणाचे (तुपासारखं रूप) कौतुक केले आहे. तसेचमी हसले गालात, पुसलं रंगमहालात' द्वारे वधूची सहज आणि लाजाळू प्रतिक्रिया व्यक्त होते. या उखाण्यात तूप-रूप, वाडा-घोडा, गालात-महालात, सुपारी-व्यापारी (वाण्यानं), बगळा-सगळा असे यमक जुळवणारे शब्द कुशलतेने गुंफले आहेत. एकदंरीतच नवरी नातलग श्रोत्यांना संपूर्ण महाराष्ट्रभर फिरवून तेथील प्रसिद्ध वस्तू गोळा करून, चिरेबंदी वाड्याचे आणि रंगमहालाचे दर्शन घडवत शेवटी ती आपल्या पतीचे (भीमराव) नाव घेते. आणि एवढा मोठा प्रपंच रचल्यावर अगदी मिश्किलपणे तक्रार करते की, 'भीमरावचं नाव घ्यायला, इळ (दिवस) गेला सगळा.' हा शेवटचा 'पंच' या उखाण्याची रंगत अधिकच वाढवतो. ग्रामीण लोकसंस्कृती, स्त्री-सुलभ भावना आणि कल्पकता यांचा हा एक उत्तम भाषिक व सांस्कृतिक नमुना आहे. हे मराठी भाषा व संस्कृतीचे असाधारण विशेष आहे.

मगर यांनी मराठवाडी लोकजीवनाचे तपशील इतक्या आत्मीयतेने रंगवले आहेत की त्या तपशीलांत एक सांस्कृतिक इतिहास सामावला आहे. "बुधवार आमच्या गावचा बाजाराचा दिवस. याच बाजारात आमच्या हप्त्याच्या कामाचा हिशेब मिळे. मजुरी हातात पडली की मग त्यातून हप्त्याचा बाजार केला जाई." (पृ. १८) किंवा "बाजाराच्या दिवशी साऱ्याच्या घरी मटन शिजत असे." (पृ. ४६) तसेच "बोकड कापायच्या वेळेला काका आम्हाला तिथे भगुणे घेऊन पाठवी. अरूण अन् मी. दोघाच्याहातात दोन भुगने असत. खाटकाने बोकडाच्या मानेवर सुरी फिरवली की आम्ही तिथं घाईने भगुनं धरीत रक्त भरलेले भगुने घेऊन आम्ही घरी येत. माय मला भगुन्यातलं रक्त चुलीवर शिजवी. शिजवल्यावर ते घट्ट होई. मग माय त्याच्या वड्या करून द्यायची. त्या वड्या कलेजीसारख्या लागत." (पृ. ४६) हे कथन वाचताना तत्कालीन ग्रामीण-दलित जीवनासोबतच अर्थव्यवस्थेचेही दर्शन घडते. या ग्रामचित्रणात केवळ सौंदर्य नाही तर, विषमतेचे काटेही आहेत. गावात बौद्धांना प्रवेश नाही. विहिरीवर पाणी मिळत नाही. पंगतीत बसवत नाहीत. हे सारे तपशील 'भोगवटा'ला एकाच वेळी एक ग्रामीण स्मृतिकथन आणि एक सामाजिक टीकाग्रंथ बनवतात. यामध्ये येणारा संघर्ष हा फक्त आर्थिक नाही; तो सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक पातळीवरही आहे. दलित समाजात जन्म घेतल्यामुळे मगर यांनी अनुभवलेली अस्पर्शिता, अपमान आणि संधींची मर्यादा यांचे चित्रण वास्तव आहे. लेखक या अनुभवांचे कथन करताना द्वेष किंवा सूडभावना व्यक्त करत नाही. उलट, या विषम व्यवस्थेचे परिणाम आणि त्यातून निर्माण होणारी मानवी वेदना समंजसतेने मांडतो त्यामुळे हे आत्मकथन केवळ दलित साहित्याचा दस्तऐवज न राहता मानवी मूल्यांचाशोध घेते.

या आत्मकथनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी चळवळीचे केवळ संदर्भ येत नाहीत तर नायकाच्या नेणत्या वयापासून बाबासाहेब अदृश्य स्वरूपात आत्मकथनभर वावरतात. कधी त्यांचा उल्लेख येतो, तर कधी चळवळ, चळवळीतील कार्यकर्ते येतात किंवा बाबासाहेबांचे विचार शब्दप्रपंचाच्या मुळाशी आहेत. याविषयी लेखकाची भूमिका- "मी येथे स्वतःला दलित समजून काहीही लिहिलेलं नाही. पण १४ एप्रिल १८९१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाजन्म झाला. आम्ही धन्य झालो. आमचं जीवन धन्य झालं. मग आम्ही चंद्राला चंद्र म्हटलं, सूर्याला सूर्य म्हटलं. त्यांनीच हे सत्य असल्याची जाणीव करून दिली. वाटेवर प्रकाश पडला." (पृ. १४) हे वचन 'भोगवटा'चा आत्मा आहे. येथे बाबुराव बागूल यांच्या"तूच सूर्याला सूर्य म्हटलेस/ आणि सूर्य सूर्य झाला/ तूच चंद्राला चंद्र म्हटलेस/ आणि चंद्र, चंद्र झाला" या ओळींची आठवतात. बाबासाहेबांनी दिलेल्या शिक्षणाच्या प्रेरणेमुळेच सुदाम मगर अनेक संकटांशी लढत शिक्षण घेतात. बारावीला अपयश आल्यावर दादाने पैसे दिले नाहीत, परिस्थिती बिकट होती तरी ते खचले नाही. त्यामागे शिक्षणाची उर्मी आणि बाबासाहेबांची शिकवणच होती. सुदामचा दादा घरी ब्लॅकबोर्डवर सुविचार लिहायचा. एकदा त्याने बाबासाहेबांचा एक सुविचार लिहिलेला होता : "आधुनिक काळातील लोकशाही म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे मूल्य मान्य करणे होय आणि प्रत्येक व्यक्तीला हे जीवन जगण्यासाठी केवळ एकदाच संधी मिळत असल्याने त्याच्यातील सुप्त गुणांची वाढ होण्यासाठी त्याला पुरेपूर संधी मिळाली पाहिजे." बाबासाहेबांचा हा विचार सुदामच्या आयुष्यात परिवर्तन घडवत असला तरी त्याच्यावर पारंपरिक संस्कृतीचे संस्कार विविध घटना, प्रसंग, कृती आणि प्रतिमांद्वारे प्रत्ययास येतात.

१९७२ चा दुष्काळ हा स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील सर्वात भीषण दुष्काळ होता. पावसाच्या अभावामुळे संपूर्ण राज्यात अन्नाचे दुर्भिक्ष निर्माण झाले होते. या संकटाने ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडून गेली होती आणि नागरिकांना पाण्यासाठी व रोजगारासाठी मोठा संघर्ष करावा लागत होता. याच वर्षी लोणगावमध्ये "मुसळया डॉक्टरच्या पोराचं बारसं होतं. जेवायसाठी समदा राजवाडा पोराबाळांसकट उलथला होता...पंगत मोठी बसली होती. गोडधोड जेवण दिल्याचं मायनं सांगितलं. पण एकदाच वाढ झाली. नंतर इकडे वाढेकरी फिरकलेच नाही. समद्यांची जेवणं झाली. पंगतीला पाणी वाढलं नाही. सगळी मंडळी जेवताना पाणी मागतहोती; पण कोणी देत नव्हतं... काहीतरी वंगाळ होणार हे तेव्हाच काही लोकांच्या ध्यानात आलं. पंगतीला बसलेल्या माणसाला पाणी वाढलं नाही, असं याआधी कधीच झालं नव्हतं. काही लोक राम मंदिराजवळील विहिरीवर स्वतः हाताने पाणी काढून पिले. ...दुसऱ्या दिवशी सकाळी बौद्धांनी

गावातील विहिरी-आड बाटवल्याची खोटी बातमी आसपासच्या गावागावात पसरली." (पृ. ३८, ३९) असे पन्नास वर्षापूर्वीचे दलितांचे जीवन आणि दलित-सवर्ण संघर्ष येथे येतो. या संघर्षामध्येदलितांवर अन्याय केला जातो. "(दलितांना) काम द्यायचे नाही, जनावरासाठी गवत काडी द्यायची नाही. दुकानातून सामान द्यायचं नाही असा फतवा निघाला. गिरणीसह सारं (बौद्धांसाठी) सारं बंद करण्यात आलं." (पृ. ४०) नानाप्रकारे त्यांची अडवणूक करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला जातो. त्यावरचं उत्तर म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचार. 'भोगवटा'मध्ये बाबासाहेबांचे विचार आणि चळवळीचे संदर्भजागोजाग येतात. लोणगावमध्ये जेव्हा दलित-सवर्ण संघर्ष होतो, तेव्हा "अंगात बाबासाहेबांचं रक्तसळसळणारी माणसं जागी झाली होती. अन्याय सहन करायला कोणीच तयार नव्हतं. याच काळात नारायण धुळाजी मगरे यांनी स्वत: किराणा दुकान टाकलं आणि अडल्यानडल्यांना मदत झाली." (पृ. ४०) किंवा "अस्पृश्यता तक्रार निवारण कायद्याखाली १२ जणांवर (सवर्णांवर) कारवाई करण्यात आली." (पृ. ४१) यामध्ये दलित-सवर्ण संघर्षामध्ये बाबासाहेबांच्या विचारांमुळे झालेला बदल, डॉ. बाबासाहेबांच्या विचार आणि धम्मक्रांतीमुळे झालेल्या विचार व जीवन परिवर्तनाचे अनेक संदर्भ येतात. तद्वतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले आत्मभानही जाणवते. "आमच्या गावातला हा पानवठा मोठ्या संघर्षातून उभा राहिलेला. या आडाला एक आंबट-गोड इतिहास आहे. त्याच्या कडू-गोड आठवणी आहेत... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून पेटलेला हा संघर्ष. त्याइतिहासाची साक्ष देत आमच्या गावातील आड उभा आहे." (पृ. ३५) तर "शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे अन् पिणारा गुरगुरतोच हे आपल्याकृतीतून दाखवून दिलं होतं." (पृ. ४२) / "आता गावात स्वातंत्र्य, समता, बंधुता एकत्रित नांदत होती गावातील जगण्याला आणि पाण्याला खरी गोडी आली होती. पाणवठ्यावर आनंदाला उधाण आलं होतं. पुन्हानवी पहाट झाली. समतेची पाखरं किलबिल करू लागली." (पृ. ४३) औरंगाबाद येथील आंबेडकरी चळवळ आणि मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर चळवळीचे संदर्भ या आत्मकथनामध्ये येतात. तसेच "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार परिवर्तनाचे वारे सर्वप्रथम कन्नडचे भाऊसाहेब मोरे, घाटनांद्राचे सिरसाट यांनी आणले. मेलेली जनावरं ओढू नका, मेलेल्या जनावराचं मांस खाऊ नका. गुलामगिरी सोडून द्या. लाचारी सोडून द्या. असं खेडोपाडी सांगत फिरू लागली." (पृ. ४६) याप्रकारे गावात चळवळीतील कार्यकर्ते येणे, सभा घेणे, जनजागृती करणे याद्वारे स्वातंत्र्योत्तर काळात संविधानासोबतच बाबासाहेबांचा विचार आणि आंबेडकरी चळवळ खेड्यापाड्यामध्ये रुजल्याचे दिसून येते. लेखक सुदाम मगर हेही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याविचाराने प्रेरित आहेत. ते म्हणतात, "बाबासाहेबांचा जन्म झाला, आमचं जीवन धन्य झालं. त्यांनीच सत्य हे सत्य असल्याची जाणीव करून दिली. वाटेवर प्रकाश पेरला. कालचे मुके आज बोलू लागले." यामुळे तो लिहितो आहे. हाच खऱ्या अर्थाचा हुंकार आहे.यापुढे जाऊन चळवळीतील ढोंगही तो उघड करतो. दादा व्यसनाधीन झाला, दलित नेते आपल्या स्वार्थासाठी अनुयायांचा वापर करतात यासारख्या चळवळीतील अनैतिक गोष्टी उजागर करायला तो घाबरत नाही. स्वत: मात्र तथागतांची प्रकाशाची वाट चोखाळतो. तो कोणत्याही विचारसरणीला आंधळेपणाने चिकटत नाही, तर स्वतःच्या अनुभवातून विचार करतो. त्याचे आत्मभान सतत जागृत आहे. तो स्वतःला 'दलित', 'अस्पृश्य', 'गरीब' या संज्ञांनी ओळखतो, पण ही ओळख हीनतेची नसून प्रश्नांकित आहे. त्याला जसे आत्मभान आहे तशीच दलित जाणीवही आहे. त्याचे आत्मभान म्हणजे आपण 'वरलाकडे' आणि 'खाल्लाकडे' या विभाजनातील शेवटच्या टोकाचे लोक आहोत, ही जाणीव. शिवाय, "कोणाचंच कोणावाचून येथे राहत नाही अन् हल्लीकोणी कोणाला येथे बरं पाहत नाही." (पृ. २१४) हे त्याने अनुभवलेले; परंतु या जाणीवेतून आत्महत्या नव्हे तर आत्मनिर्मितीची चळवळ उभी राहते. आपणही माणूस आहोत ही जाणीव येथे वारंवार प्रकटते. तो म्हणतो, "आता जगायचं तर डोक्यात राग नको. विचार हवा. विवेक हवा. जिद्द हवी. ती माणसाला उठवून बसवते. मरण नकोय ते भ्याड असतं. मरण काही प्रक्रिया नाही तो ऱ्हास आहे. उभ्याआयुष्याचा. मूठमाती आहे, उराशी बाळगलेल्या गोड स्वप्नांची अन् राखरांगोळी आहे तिला देऊ केलेल्यासुगंधी फुलांची. व्यथासहित..." (पृ. २१५)

शिक्षण, स्वाभिमान, सामाजिक परिवर्तन आणि मानवी प्रतिष्ठा या मूल्यांचा स्वीकार लेखकाच्या जीवनदृष्टीत दिसतो. त्यामुळे 'भोगवटा' ही केवळ दुःखकथा राहत नाही; ती परिवर्तनाच्या आशेची आणि नव्या सामाजिक जाणीवेची कथा बनते. जीवनात अनेक आव्हाने येऊनही तो न डगमगता वाटचाल करतो. आपण काहीतरी वेगळे करू शकतो हा विश्वास त्याच्यामध्ये असल्याने तो 'भोगवटा' मांडतो. त्याला मित्र योगिराज बागूल यांच्या 'पाचट' आणि 'तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा' या दोन पुस्तकांनी बळ मिळते. शिवाय, योगिराज बागूल हे त्याला लिहिण्यासाठी प्रेरित करतात. शिक्षणाची आणि साहित्याची जाणीवच त्याला रिक्षा चालवत असतानाही कविता करण्यास भाग पाडते. 'एक हाथ में किक, दुसरे हाथ में भीक' या रिक्षावाल्यांच्या म्हणीवर तो 'एक हाथ में किक, दुसरे हाथ से कुछ सीख' असा अर्थ काढतो. ही आत्मजाणीव त्याच्यातील कवी-लेखकाला जिवंत ठेवते. अनेक अडचणींनंतरही तो म.फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेमध्ये एम. ए. करतो. वकील होण्याचे स्वप्न पाहतो. ही जाणीव आत्मविकासक आहे. यापलीकडे जाऊन तो पत्नी पुष्पाला एम

कॉम. पर्यंत शिकवून नोकरीला लावतो. स्वत:च्या पायावर उभं करतो. त्याच्यामध्ये स्त्रीविषयक आदर आणि समदृष्टी आई सखुबाईमुळे रूजली.

'बलुतं'मधील दगडूच्या स्वाभिमानी आजीप्रमाणेच सुदामची माय सकुबाई ही या आत्मकथेची खरी नायिका आहे. ती अशिक्षित असूनही हुशार होती. लोकांचे विंचू उतरवणे, थान उतरवणे, पोटाची गाठ बसवणे, सकुन पाहणे अशा अनेक गोष्टी ती करत असे; पण आपल्या सुदाला विंचू चावला तो मात्र तिच्याकडून लवकर उतरेना तेव्हा ती व्याकुळ होते. लेखकाच्या डोक्यावरील बापाचं छत्र लहानपणीच हरवल्यामुळे सखुबाई हीच त्याची माय अन् बाप होते. पतीच्या मृत्यूनंतर तिच्या वाट्यालाही वेदना आली, संघर्ष आला, अवहेलना आली; पण ती कधीही डगमगली नाही. तो म्हणतो, "माय मला कधी कधी सांगे, 'दादा, तुह्या बापाच्या राज्यात मी लय राज केलं. तवा सारं सुख पाहिलं. तुव्हा बाप सावकारकी करायचा. डोहराला धंद्यासाठी पैसे द्यायचा. त्यांची मोट गहाण ठेवायचा. आपल्या घरी कामाला गडी होते, सालदार होते, महिनदार होते. खंडीभर बकऱ्या होत्या. मह्या नाकात भारी नथ होती, दंडात तोडे पायात कडे होते. हातात चांदीचे कंगण होते. मला ओझं होईल एवढे दाग मह्या अंगावर होते. माय असं सांगायची तेव्हा नवल वाटायचं. तिनं सर्वस्वगमावलं होतं, तरीही ती हारली नव्हती. ती परिस्थितीशी झुंजत होती. मायनं कष्टाची भाकर खाल्ली. कधी कुणापुढे हात पसरला नाही, वेळ पडली तर घरातली भांडी-कुंडी गहान टाकली. आता तिच्याजवळ काही नाही. स्वाभिमान मात्र तिनं गमावला नव्हता." (पृ. ३७) सखुबाईच्या स्वाभिमानामुळे, अतोनात कष्टामुळे सुदामसह भावंडं आयुष्यात स्वाभिमानाने उभी राहिली. ती अशिक्षित असली तरी तिला शिक्षणाचे महत्त्व समजले होते. त्यामुळे ती सुदामला शिकवण्याचा प्रयत्न करते. मोठ्या भावाला (भीमराव दादा) शिकवण्यासाठी घरातील भांडी-कुंडी गहाण ठेवते. त्यामुळे ती या आत्मकथनाचा कणा आहे, केंद्र आहे. स्वतःच्या सुखाचा विचार न करता मुलांच्या भवितव्यासाठी झटणारी आई ही केवळ लेखकाची आई राहत नाही; ती भारतीय श्रमिक स्त्रीचे प्रतीक बनते. तिच्या कष्टांचे वर्णन करताना लेखक भावनाविवश होतो; परंतु कुठेही कृत्रिम करुणा निर्माण करण्याचा प्रयत्न करत नाही. एखाद्यावेळी अचानक ती रात्री झोपल्यावर सुदामला विचारते, "दादा, मी मेल्यावर तू रडशील की नाही?" (पृ. ३७). यावर लेखक अस्वस्थ होई. "मायला काही बोलायच्या आधीच मह्या डोळयात पाणी यायचं. मायनं असं काहीबाही बोलू नये असं मला वाटायचं. माय कधीच मरू नये असं वाटे. म्हणून मी तिला हलवून उठवी. मायनं चुळबुळ केली की मला बरं वाटे. मायच्या आधी आपणच मरावं असं वाटे." (पृ. ३७). पण जेव्हा मायचा मृत्यू होतो, तेव्हा तो रडू शकत नाही, "मी मायजवळून उठलो आणि बाहेर अंगणात जाऊन बसलो. ...माझ्या डोळयांत आश्रू नव्हते. कुठे गेले होते माझे आश्रू कुठं आटले होते ते?" (पृ. १९३). दु:खाचं, वेदनेचं गोठणं जे आहे, त्याचा प्रत्यय येथे येतो. एकदा जेव्हा सुदामचा अॅक्सिडेंट होतो, तेव्हा ती स्वत:च्या गळयातले मणी मोडून त्याच्यासाठी खारीक-खोबरं घेऊन येते; पण मुलगा मात्र तिला दोन सोन्याचे मणी करू शकत नाही. ही नतद्रष्टता परिस्थिती आणि काळाने निर्माण केलेली असते की माणसाने स्वत:? याचं उत्तर सहज मिळत नाही. एकूणच, माय ही व्यक्तिरेखा संपूर्ण आत्मकथेत एक करूण आणि कर्तृत्ववान स्त्री म्हणून उभी राहते. ती अशिक्षित असूनही हुशार आहे. स्वतःच्या मुलाला शिस्त लागावी म्हणून खोटे खोटे विष पाजते. या वेदनेत शिस्त आणि माया यांचा गुंता आहे. मगर यांच्यावेदनेला कारुण्याची किनार आहे. संयम, शांतता आणि रुजूता हे त्यांचे स्वभावविशेष आहेत. सुदाम मगर यांच्याकडे पाहिले की नेहमी प्र. ई. सोनकांबळे यांची आठवण येते. मगर हे शांत, मितभाषी असले तरी विद्रोही आहेत. त्यांचा विद्रोह हा प्रकट नसून सूक्ष्म व कारक आहे. त्यांच्या कृतीतून नकार येतो. उदा. मुलगी पाहताना 'नाही' म्हणणे, लॉटरीचे खोटे कट उघड करणे, ब्रेड विकताना पोलिसांविरुद्ध दीनवाणी विनंती करणे वगैरे. यामध्ये विद्रोह नसून उरलेली माणुसकी जपण्याची वृत्ती आहे. मात्र सिडको प्लॉटच्या वादात तो उभा राहतो. "मी हा प्लॉट सहजासहजी सोडणार नव्हतो." हा विद्रोह आंबेडकरी चळवळीतून आलेला असला तरी 'संघर्ष कर, पण शिस्तीने' अशा स्वरूपातील आहे. ते सामाजिक अन्यायाला नकार देतात, सामाजिक श्रेष्ठत्वाला नकार देतात. तसेच व्यवस्थेच्या नियमांनाही नकार देतात.

जे सुदाम मगर यांच्याशी परिचित आहेत, त्यांना माहीत आहे की, सुदाम मगर बोलताना नेहमी कोट्या करतात, विनोद करतात. नव्हे तर, हा त्यांचा स्वभावधर्म आहे. 'भोगवटा'मध्येही त्यांच्या या शैलीचा प्रत्यय येतो. एकदा दोघा नवराबायकोची भांडणं होतात तेव्हा पुष्पा त्यांच्या दंडाला चावते. यावेळी त्यांना वाटते की, आपण टीटीचं इंजेक्शन घ्यावं; पण डॉक्टरला 'बायको चावली' असं कसं सांगावं असा त्यांना प्रश्न पडतो. तेव्हा ते लिहितात, "वकिलाला, पोलिसाला आणि डॉक्टरला खोटं कधी बोलू नये, हे मी जाणून होतो, पण बायको डसली, हे कसं सांगणार? हा तर आपला अपमान आहे. कुत्रं मांजर चावलं असं सांगावं तर त्यादुसरंच इंजेक्शन द्यायच्या. मी त्यांना म्हणालो, 'मला कुत्रं चावलं.' त्यावर त्यांनी, 'बाहेरचं आहे की पाळीव आहे? असं विचारलं." (पृ. १९४) यावर ते बायको चावल्याचं सांगतात. त्यावर डॉक्टर म्हणतात, "त्या आता नाही चावणार.' यानंतर मगर म्हणतात, 'नाही मॅडम, ती आता मला सोडणार नाही. आता तिच्या तोंडाला माझं रक्त लागलंय." (पृ. १९४) यासारख्या छोट्या छोट्या प्रसंगातून त्यांच्या विनोदी, मिश्किल शैली बरोबरच

प्रामाणिकपणाही प्रत्ययास येतो. लेखक स्वतःबद्दल अत्यंत प्रामाणिक आहे. स्वतःच्या चुका, अपयश, दुर्बलता तो लपवत नाही. 'अपयशाचा' जो तथाकथित कलंक असतो, तो लेखक ठळकपणे मांडतो आणि तिथेच 'भोगवटा' हे आत्मकथन इतरांपेक्षा वेगळे ठरते. "आजपर्यंतच्या आयुष्यात जे भोगलं त्याविषयीचा आडपडदा न ठेवता सारं जसंच्या तसंच मांडलं. मी जे भोगलं त्याचा हा'भोगवटा'. प्रत्येकाचा भोगवटा वेगळा असतोय. असणारच!" (पृ. २१६) अशी त्यांची भूमिका. 'भोगवटा'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील आत्मपरीक्षण. लेखक केवळ समाजावर टीका करत नाही, तर स्वतःच्या आयुष्याकडेही चिकित्सक नजरेने पाहतो. स्वतःच्या चुका, मर्यादा, अपयश आणि मानसिक संघर्ष यांचाही तो प्रामाणिकपणे स्वीकार करतो. ही आत्मचिकित्सा आत्मकथनाला विश्वासार्हता प्राप्त करून देते. अनेक आत्मकथनांमध्ये स्वतःचे उदात्तीकरण करण्याची प्रवृत्ती असते, मात्र 'भोगवटा'मध्ये लेखक स्वतःला नायक बनवत नाही. तो एक सामान्य माणूस म्हणून आपल्या अनुभवांची मांडणी करतो.

आईच्या संस्कारामुळेच सुदाम मगर यांनी आपल्या जीवनातील कटू अनुभव मांडताना कुठेही दयेची भीक मागितलेली नाही. उलट, आयुष्याने दिलेल्या प्रत्येक जखमेचा स्वीकार करून त्यातून उभे राहण्याची वृत्ती त्यांनी दाखवली आहे. ब्रेड विकण्यापासून ते वेटर, दुकानदार, वॉचमन म्हणून राबणे, किराणा दुकान चालवणे, कुल्फी विकणे, सुपरवायझर म्हणून काम करणे, रिक्षा चालवणे अशा अनेक व्यवसायांतून ते जीवन जगतात. या सर्व अनुभवांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व घडते. शिक्षण, साहित्य आणि सामाजिक जाणीव यांच्या बळावर त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या या अनुभवांमधून समाजातील विविध स्तरांचे वास्तव, श्रमाचे महत्त्व, उपजीविकेसाठीची धडपड आणि स्वाभिमानाने जगण्याची वृत्ती यांचे दर्शन घडते. त्यामुळे हे आत्मकथन एका व्यक्तीची यशोगाथा न राहता श्रमसंस्कृतीचा गौरव करणारे साहित्य बनते.

'भोगवटा' मध्ये दलित समाज जीवनातील वेदना, अपमान, संघर्ष आणि स्वाभिमान यांचे प्रत्ययी चित्रण आहे. मात्र हे आत्मकथन केवळ दुःखाची नोंद नाही; ते आशेचे आणि जिद्दीचेही चित्र आहे. सुदाम मगर या नायकाचा जीवनप्रवास हा प्रत्येक संघर्षशील माणसासाठी प्रेरक आहे. जीवन आणि शिक्षणासाठी संघर्ष करत ते शून्यातून विश्व निर्माण करतात. आज साठी गाठलेली असताना ते लिहितात, "समाधान याचंच की कालपर्यंत धडपडत नि अडखळत चालणारा मी. आजही माझी रिक्षा घेऊन औरंगाबादच्या खाचखळगे असलेल्या रस्त्यावरून पूर्वीसारखाच आताही न अडखळता नि बिनधास्त चालू लागलो आहे. कशाचीही नि कुणाचीही पर्वा न करता!" (पृ. २१६) सुदामचा प्रवास हा सर्वांसोबत अन् सर्वांसाठी असूनही स्वतंत्र आहे. एका अर्थाने त्यांचा मार्ग 'एकला चलो रे'चा आहे. सुरेश भटांच्या शब्दात सांगायचे तर-

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा !

भोग जे येती कपाळी ते सुखाने भोगतो;
अन् कळ्या झाल्या कधीच्या सोशिल्या ज्या ज्या कळा !

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागतो ह्या सावल्यांच्याही झळा !

राहती माझ्यासवे ही आसवे गीतांपरी;
हे कशाचे दुःख ज्याला लागला माझा लळा !

माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

सुदाम मगर हा कुणी नेता, विद्वान किंवा प्रसिद्ध व्यक्ती नाही; तो एक सामान्य दलित माणूस आहे जो जगत राहतो, लिहीत राहतो; तरीदेखील तो इतरांपेक्षा वेगळा आहे. 'शिवी'ला 'ओवी' आणि 'अरे'ला 'कारे'ने उत्तर देण्याच्या काळात सुदाम मगर अतिशय सयंतपणे

आपला भोगवटा कथन करतात. त्याचा रंग समकाळापेक्षा वेगळा आहे. त्यमुळे सुरेश भटांच्यावरील ओळी सुदाम मगर यांच्या जीवन चरित्राला तंतोतंत लागू पडतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एका पिढीचा आत्मविश्वास, शिक्षणाच्या माध्यमातून बदल घडवून आणण्याची धडपड आणि सामाजिक उन्नतीची आकांक्षा ‘भोगवटा’मधून स्पष्टपणे जाणवते. १९८२ मध्ये औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला-वाणिज्य महाविद्यालयात असताना बारावीला गचकल्यानंतर जगण्यासाठी केलेली धडपड ही या आत्मकथनातील बीजकथा आहे. तत्पूर्वी दुसऱ्या इयत्तेपासूनच त्याला दरेगाव (दिनेगाव स्टेशन), पाथर्डी (जि. अहमदनगर), जालना इत्यादी ठिकाणी रिमांड होम, बी. सी. होस्टेल मध्ये राहवे लागते. तेथील कडक शिस्त, पहाटे उठणे, पसायदान, आव्हाड सरांची छडी हे सर्व तो सहन करतो. येथेच त्याला कवितेची गोडी लागते. भूक, दारिद्र्य, नोकरीची धडपड यातून तो वेळ काढून लिहीत असे. “बोर्डिंगात जेवणाची दैना. चपात्या कच्च्या असायच्या. पोट दुखायचं. हगवण लागायची.” (पृ. ७९) अशा स्थितीत तो शिक्षण घेतो. एकदा सातवी बोर्डाच्या परीक्षेदरम्यान चांदईला असताना तो तोंडात सुकडी टाकतो. तेवढ्यात गुरुजी वर्गात येतात. त्याला उभे करून ‘तोंडात काय आहे?’ असे विचारतात. सुदामच्या तोंडात सुकडी असल्याने त्याला बोलता येत नाही. तोवर गुरुजी तोंडात मारतात. तेव्हा तोंडातली सुकडी गुरुजींच्या तोंडावर उडते आणि सर्व वर्ग हसू लागतो. सुदाम म्हणतो, “माझी चांगलीच फजिती झाली होती. मी तरी काय करणार? तोंडातल्या सुकडीने तोंड गळून आलं होतं.” (पृ. ८२) पण या फजितीतही त्याला लग्नातील ‘मुकळा मुकळी’ची (गुळणा गुळणी) आठवण होते ही त्याची हलक्या फुलक्या विनोदाने दुःख, ताण हलके करण्याची शैली आहे. शिक्षणात त्याला नेहमी अडचणी आल्या. इंग्रजी कच्ची तर गणिताची भीती. दुसऱ्याच्या वह्या आणून होमवर्क करणे वगैरे. पण त्याने कधीही हार मानली नाही. तो म्हणतो, “मी एनसीसी घेतली, रोज नियमित जाऊ लागलो.” शिस्तीचे हे बाळकडू त्याला आयुष्यभर उपयोगी पडले.

‘भोगवटा’ ही आत्मकथा एका व्यक्तीची कथा राहत नसून ती एका संपूर्णसमाजाच्या संघर्षाची कहाणी बनते. दारिद्र्य, सामाजिक भेदभाव, अपयश आणि प्रतिकूल परिस्थिती यावर मात करून माणूस कसा उभा राहू शकतो, याचा हा जिवंत दस्तावेज आहे. जीवनाच्या रणांगणात वारंवार पराभूत होत असूनही हार न मानणाऱ्या सुदामची ही प्रेरणादायी गाथा आहे. तद्वतच ‘भोगवटा’ हे आत्मकथन व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंधांचे, संघर्ष आणि स्वप्नांचे, वेदना आणि जिद्दीचे प्रभावी चित्रण करते. हे वाचताना वाचकाला सुदाम नावाच्या एका सामान्य माणसाचा जीवनप्रवास तर समजतोच; त्यासोबतच भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, गरिबी, श्रमिक जीवनाचे वास्तव, शिक्षणाचे महत्त्व आणि मानवी जिद्दीचे सामर्थ्य यांचाही प्रत्यय येतो. त्यामुळे ‘भोगवटा’ हे केवळ आत्मकथन नसून सामाजिक इतिहास, मानवी संघर्षआणि आत्मविश्वास यांचा दस्तऐवज म्हणून लक्ष वेधते.

सुदामच्या आयुष्यामध्ये संघर्ष, वेदना आणि वनवास आहे, तसेच प्रेमही आहे. वैशाली ही सुदामची प्रेयसी. तिच्यावर त्याने कविता लिहिल्या. तिच्या आठवणीत तो दिवसरात्र वेडा झाला. पण हे प्रेम एकतर्फी होते. सुदाम लिहितो की, “वैशालीच्या प्रेमाचं भूत मला काही करू देत नव्हतं. मला वैशालीचं वेड लागलं होतं. कधी मी तिच्यामागं मागं जायचो. फक्ततिला डोळे भरून पाहण्यासाठी. माझ्या नकळत ती मला हुलकावणी देऊन गायब व्हायची. तेव्हा तर पोटात खड्डा पडल्यासारखं होई.” (पृ. १०४) त्याने तिच्यासाठी अनेक उठाठेवी केल्या ते फक्त तिला डोळे भरून पाहण्यासाठी. पण ती कधीच त्याच्याकडे वळली नाही. त्याचे प्रेम हे शुद्ध, निःस्वार्थ आणि हृद्य आहे. तो म्हणतो, “मला वाटायचं की तिचं माझ्यावर प्रेम आहे माझं तिच्यावर प्रेम असल्याचं सत्य कधीतरी तिच्या नजरेसमोर येईल असं मला वाटायचं.” (पृ. १०४) पुढे दोघेही परीक्षेत नापास होतात, तेव्हा वैशालीची बहीण राजश्री सुदामला म्हणते, “कोणाचं आयुष्यउद्ध्वस्त करण्याचा कोणाला काय अधिकार आहे?” यावर सुदाम म्हणतो, “तू म्हणत असशील तर मी हे शहर सोडून जातो.” (पृ. १०६) येथेच त्याच्या नितळ प्रेमाचा प्रत्यय येतो. नाहीतर हल्ली ‘तू मेरी नहीं तू किसी और की नहीं ही त्याची वृत्ती नाही. त्याने राजश्री म्हटल्याप्रमाणे तो शहर सोडून आक्काकडे बुलढाण्याला शिकायला जातो. त्याने तिच्यासाठी त्याग जरी केला तरी त्याच्या आयुष्यात केवळ आणि केवळ विरह येतो. पुढे पुष्पाशी लग्न झाल्यानंतर सुदामच्या आयुष्यात स्थैर्य येते; पण तो आयुष्याच्या उत्तरार्धातदेखील वैशालीला विसरू शकलेला नाही. सुदाम पत्नी पुष्पाचं एम. कॉम. पर्यंतचं शिक्षण पूर्ण करून घेतो. तिला ट्रेझरीमध्येनोकरी लागते. ती नोकरी करते, घर सांभाळते, मुलांना वाढवते. याविषयी तो कृतज्ञता व्यक्त करतो, “माझी अर्धांगिनी पुष्पा हिने खूप सोशिकपणा दाखवून सहकार्य केले. तिने घरसंसाराचा भार एकटीच्या शिरावर घेतला.” पण हा संसारही सहज सुरळीत नव्हता. पुष्पा आणि सुदाम यांच्यात भांडणे झाली. एकदा तर पुष्पाने पोलिस बोलावले, सुदामला अटक झाली. याविषयी सुदाम लिहितो, “माझा अपमान होत होता; पण कुणाला काय त्याचं?” हा प्रश्न वैवाहिक आयुष्यातील कटू वास्तव अधोरेखित करतो. तरीही हे दोघे टिकले. पत्नी पुष्पाशी झालेला विवाह, सासूशी झालेल्या भेटीचे वर्णन, मुंबईतील वातावरण, आणि परतल्यानंतरचा संसार याद्वारे त्याची पुष्पाविषयी आत्मीयता आणि कृतज्ञता ठळकपणे जाणवते. आता पुष्पा पेन्शनवर

निवृत्त आहे. मुलगा कुशल मुंबईलाअधिकारी आहे. मुलगी भूमिका उच्चशिक्षण घेत आहे; पण "मी, सुदाम मगर मात्र अजूनही तोच नि तसाच आहे." (पृ. २१५) वरवर पाहता 'हे' त्याच्या आयुष्यातील समाधान असलं तरी (खरं तर) ही त्याची खंतही आहे. कारण "आज वेळ बदललीय. मानसंही बदलली. त्यांनी सुधारणा केलीय. ती सुधारलीय. पण माझं काय? त्यांनी मनं बदललीय. माझ्या मनाचं काय?" (पृ. २१३) हा प्रश्न निरूत्तर करणारा आहे. शेवटी तो म्हणतो, "समाधान याचच की कालपर्यंत धडपडत नि अडखळत चालणारा मी. आजही माझी रिक्षा घेऊन औरंगाबादच्या खाचखळगे असलेल्या रस्त्यावरून पूर्वीसारखाच आताही न अडखळता नि बिनधास्त चालू लागलो आहे. कशाचीही नि कुणाचीही पर्वा न करता!" (पृ. २१६)

एकूणच, मराठवाड्यातील ग्रामीण-दलित जीवन, गावातील जातींचे विश्व आणि त्यांचे परस्परसंबंध, जातीय संघर्ष, दलित चळवळ, रोजगारासाठी शहरात आलेल्या दलित (खरे तर सर्वच) तरुणांची असुरक्षितता, रोजगारासाठी साहावे लागणारे अपमान, पोलीस, व्यवस्था आणि कमजोर माणूस, श्रमप्रतिष्ठा, प्रेम, कौटुंबिक जीवन आणि जातवास्तव इ. अशी काही महत्त्वाची आशयसूत्रे या आत्मकथनातून दृग्गोचर होतात. या प्रभावी आशयसूत्रांप्रमाणेच 'भोगवटा'ची भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या आत्मकथनाची निवेदन पद्धती कथनात्मक (narrative) आहे. निवेदनामध्ये मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-जालना परिसरातील बोली व प्रमाण भाषेचा अवलंब केलेला आहे.ही भाषा साधी, सरळ, ओघवती आणि अनुभव समृद्ध आहे. ती शिष्ट मराठीपेक्षा वेगळी, ग्रामीण, जिवंत आणि थेट आहे. आत्मकथनामधील या भाषेची काही ठळक वैशिष्ट्ये: अलंकारिक शब्दांचा आडोसा न घेता सुदाम मगर यांनी जसे आहे तसे वास्तव मांडले आहे. त्यामुळे कथन अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह वाटते. अनेक प्रसंग वाचकांच्या मनाला चटका लावतात, तर काही प्रसंग प्रेरणादायी आहेत. मराठवाड्यातील ग्रामीण शब्दकळा, प्रतिमा, प्रतीक, वाक्प्रचार, म्हणी, बोलण्याची ढब, लय, संवाद यामुळे हे आत्मकथन वाचनीय व प्रभावी वाटते. उदा. "मव्हा लेक लय कामदार हाय", "कोरभर भाकर आणि घोटभर पाण्याशिवाय त्याला दुसरं काही सुचत नव्हतं", "दादा, लावना रे उलसिक बोटी", "लय जोर आलाय माय", "खुंटीला टांगलेला पोहरा, लोखंडी घागर आणि कापडाची चुंभळ करून डोक्यावर घेतली की माय तुरू तुरू आडावर निघे", "कोंबडी खुडूक झाली की माझं कॉलेज बुडायचं" यातील 'मव्हा', 'लेक', 'लय', 'कोरभर' 'बोटी', 'पोहरा', 'घागर', 'चुंभळ' हे शब्द मराठवाडी बोलीतील आहेत. कोंबड्या, डुकरं, शेती, विहीर, राजवाडा यांचे चित्रण बोलीमय आहे. संवादशैलीही तितकीच सहज आहे. त्यामुळे ती वाचकांच्या मनाचा ठाव घेते. येथेअलंकाराचा सोस नाही, अनावश्यक शब्दांचा भार नाही. प्रसंगांच्या चित्रणात सिनेमॅटिक जिवंतपणा आहे. कोंबडीच्या अंड्यांचीकहाणी असो, बोर्डिंगमधील रात्रींचे वर्णन असो, किंवा मुंबईतील रेल्वे स्टेशनवर उतरण्याचा क्षण, कोंबडीच्या पिल्लांचे वर्णन, आंब्याच्या बागेतील प्रसंग असो प्रत्येक प्रसंग निवेदनाद्वारे डोळ्यांसमोर उभा राहतो. उदा. सुदाम बोर्डिंगमध्ये असताना - "कपड्याला उवा झाल्या. मी खाजवायचो. खाजवून खाजवून माझं अगं ढवळंफटक व्हायचं. जिथवर हात जायचा तिथवर हात घालून खाजवायचो. कधी उवा वेचून काढायचो आणि नखाने टचकन मारायचो. ऊचं पोट फुटलं की रक्ततोंडावर उडायचं. नख लालजरद व्हायचं. माझ्याच रक्ताची मला किळस यायची. मी कडक उन्हात बसायचो. उन्हाने उवा बोकाळायच्या. कॉलरच्या, सदऱ्याच्या शिलाईत त्या लपून बसायच्या. ही धरू का ती धरू, असं व्हायचं." (पृ. ८०) तसेच 'मुंग्यावाणी गर्दी', 'डुकरावानी गटारात लोळणे', 'पोटात कावळे ओरडणे' अशा प्रतिमा वाचकाच्या मनात घर करून राहतात. 'माय', 'काका', 'मोठ्या मुश्किलीनं', 'तसं मला झालं' अशी देशी वळणाची वाक्ये आणि 'असतं', 'होतं', 'वाटतं', 'म्हणतो', 'जातो' असे प्रवाही क्रियापदे येतात. खेड्यातली माणसं जशी बोलतात तसे लेखक कथन करतो. त्यामुळे वाचक कथनाचा अविभाज्य भाग होतो. 'हुलग्याची भाकर', 'वाळणे', 'लिंबोळया', 'आमच्या वड्यात', 'डुब्या', 'कांडवाची आंबा', 'डंकीण', 'थान', 'सकुन', 'डली', 'चानी', 'सागुती', 'चलीतर', 'हाडुळं' या मराठवाडी शब्दांना सांस्कृतिक संदर्भ आहेत. प्रत्यक्ष संवादांचा समर्पक वापर हे या आत्मकथनाचे बलस्थान आहे. माय-मुलगा, नवरा-बायको, मित्र-मित्र यांचे संवाद इतके सजीव आहेत की ते वाचताना एक नाटकीय परिणाम साधला जातो. या भाषेमध्ये चित्रदर्शीता आहे. लेखक घटना, प्रसंगांचे वर्णन करताना भावनांचा कल्लोळ आणि अभिव्यक्तीची गुणवत्ता यांची सहज सांगड घालतो. त्यामुळे प्रत्येक घटना, प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. लेखक स्वत: कवी आणि कवितेचा रसिक असल्याने मध्ये मध्ये स्वत:च्या कविता, शाहीर वामन दादा कर्डक यांची गाणी/कविता येतात. "आज कशी निळया नभात/ चांदणी नजरेस आली/ मदमस्त धुंदीत सागर किनारी / रात कशी अवचित झाली" (१३७) किंवा "असून पौर्णिमा / नांदतो इथे / अमावस्येचा काळोख / पटे ना झाली येथे / दिवसाढवळ्या / मानसाला मानसाची ओळख" (११५) या ओळी आत्मकथनाला एक काव्यात्म खोली प्रदान करतात. कठीण प्रसंगांतही लेखकाची विनोदी शैली दिसून येते. वास्तवात या विनोदाचा उगम वेदनेतूनअसल्याने तो अधिक परिणामकारक ठरतो. सोबतच "शब्द हे विचारांच्या मागून येतात. शब्दात सामर्थ्य असतं." (१२६),"मीच उभ्या केल्यात सभोवताली या भिंती, आशा आकांक्षापोटी, लालसेपोटी.", "कर्तव्याची अन् नीतिमूल्यांची आधी सांगड घालायला शिकलं पाहिजे.", "शिक्षणासाठी निव्वळ समजदार

असून चालत नाही." (पृ. २१४), "सोन्याची पारख सोनाराला असते. मातीची पारख शेतकऱ्याला असते, तशी कुंभारालाही असते. शिक्षणाची (ज्ञानाची) पारख प्रज्ञावंताला असते.", "मरण नकोय ते भ्याड असतं. मरण काही प्रक्रिया नाही तो ऱ्हास आहे. उभ्या आयुष्याचा." पृ. २१५) इत्यादी सुभाषितवजा वाक्य, सुविचारही येतात. मराठवाडी भाषेचे शब्दवैभव, लोकसंगीताचे संदर्भ, गाण्यांच्या ओळी, चित्रपट गीते, 'बोली बामणाची नि चाल गाढवाची' यासारख्या म्हणींमुळे 'भोगवटा' हे आत्मकथन एक भाषिक-सांस्कृतिक दस्तावेजही बनते. असे असले तरी या आत्मकथनामध्ये काही उणिवा आहेत. या आत्मकथनातील काही प्रसंगांमध्ये पुनरावृत्तीआहे. कुशल संपादनाने पुस्तक अधिक बंदिस्त होऊ शकले असते. तसेच काही ठिकाणी संदर्भ अधिक स्पष्ट केले असते तर मराठवाड्याबाहेरील वाचकांना ते अधिक उपयुक्त ठरले असते. कथनाच्या ओघात आठवणींमुळे घटनांचा कालक्रम स्पष्ट नाही, ज्यामुळे वाचकांचा थोडा गोंधळ होतो. तद्वतच या आत्मकथनाचा बाह्य राजकीय-सामाजिक घटनांशी अधिक संवाद होण्याची गरज आहे. मात्र आत्मकथन बव्हंशी व्यक्तिगत अनुभवांपुरते मर्यादित राहते. तसेच आत्मकथन सुरुवातील कुलवृत्तांतामुळे वाचकांच्यामनाची पकड घेत नाही. तेथे तपशीलांमुळे लालित्याच्या अभाव जाणवतो. तरीही याचा पूर्वार्ध अधिक जिवंत आणि चित्तवेधक आहे; उत्तरार्धामध्ये (विशेषतः नोकरीच्या प्रसंगांमध्ये) काही ठिकाणी कथनाचा वेग मंदावतो. असो!

'भोगवटा'चा क्रम इतिहास ते वर्तमान, खेडे ते शहर, काळोख ते प्रकाश असा आहे. स्वत:च्या आयुष्याचा 'भोगवटा' मांडताना नायक सुदाम शेवटी म्हणतो, "मी ५४ वर्षांचा (२०१७ मध्ये) झालो आहे. मी आज कमजोर होऊ लागलोय. माझी नजरही कमजोर झालीय पण भिंत स्पष्ट दिसतेय आजही" (पृ. २१४) ही भिंत जातीय भेदभावाची, विषमतेची, अपमानाची आहे. ती अजूनही तशीच उभी आहे. नव्हे तर, ती अधिक मजबूत होत चालली आहे. या सर्वांमुळे अस्वस्थ होऊन तो अनेक प्रश्न करतो, "आज वाटतं,

कुणी आहे का आपले या जगात? कुणाचे आहोत का आपण?
माझा समाज आहे की, मी समाज आहे?
हा समज आहे की, माझा गोड गैरसमज आहे?
मी समाजाशिवाय जगू शकत नाही की, समाज माझ्याशिवाय राहू शकत नाही?
कर्तव्य श्रेष्ठ की, नीतिमूल्ये?
कर्तव्य श्रेष्ठ तर नीतिमूल्यांचं करायचं काय?" (पृ. २१४)

हे प्रश्न समाजासाठी आहेत. समाजातील प्रत्येक माणसांसाठी आहेत. पुरोगामी राज्यासाठी आहेत, तसेच लोकशाही धर्मनिरपेक्ष संविधानवादी देशासाठी आहेत आणि देशातील सर्वोच्चअसलेल्या कार्यकारीमंडळ, कायदेमंडळ, आणि न्यायमंडळासाठी आहेत. 'हे' सर्व थांबणारं नाही. गरज आहे ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता वगैरे वगैरेंचे वाचन-पुनर्रवाचन, मनन-पुनर्रमनन, चिंतन-पुनर्रचिंतन...

थोडक्यात, मराठी दलित आत्मकथन परंपरेत 'भोगवटा' हे आत्मकथन दखलपात्र ठरते. 'भोगवटा'मधील कथा ही केवळ एका व्यक्तीच्या जीवनसंघर्षाची कहाणी म्हणून मर्यादित राहत नाही; तर एका संपूर्ण सामाजिक वास्तवाचे, एका पिढीच्या वेदनांचे आणि परिवर्तनाच्या ध्यासाने झगडणाऱ्या माणसाच्या मानसिक प्रवासाचे प्रतिनिधित्व करणारे स्वकथन म्हणून समोर येते. 'भोगवटा' मध्ये वाचकांना एका सुदाम मगर या व्यक्तीच्या आयुष्यासोबतच समाजातील विषमता, मानवी जिद्द, मातृत्वाचे सामर्थ्य आणि शिक्षणाची परिवर्तनकारी ताकद यांचाही प्रत्यय येतो. हे आत्मकथन वाचकाच्या मनात संवेदनशीलता निर्माण करते. संघर्ष करणाऱ्या माणसांविषयी आदर निर्माण करते आणि आयुष्याकडे अधिक व्यापक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देते. चांगल्या साहित्याचे अंतिम ध्येय जर माणसाला माणसाशी जोडणे असेल, तर 'भोगवटा' हे आत्मकथन ते ध्येय यशस्वीपणे साध्य करते. दु:खाला शरण न जाता त्याला सामोरे जाण्याची ताकद माणसात असते, याचा प्रत्यय 'भोगवटा' वाचताना वारंवार येतो; आणि म्हणूनच हे आत्मकथन वाचकाला अंतर्मुखतर करतेच, पण त्याचबरोबर नव्या उमेदीने जगण्याची प्रेरणाही देते. तद्वतच 'भोगवटा' हे आत्मकथन ग्रामीण-दलित जीवनाचा प्रामाणिक आरसा आहे. या आत्मकथनात आशयाची व्याप्ती, आत्मभानाची तीव्रता, आत्मसिद्धतेचा ध्यास, शब्दांशिवाय राहिलेल्या वेदना, मूक पण सातत्यपूर्ण विद्रोह, सामाजिक नकार, प्रत्येक क्षणी उजळणारी प्रामाणिकता आणि जिवंत भाषाशैली या सर्व घटकांनी एक समग्र जीवनकथा उभी केली आहे परंतु हे दर्शन घडवणारा सुदाम कुठेही स्वतःबद्दल अनुकंपा निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत नाही, हे या कथनाचे मोठे यश आहे. सुदाम मगर शिष्ट समाजाच्या करुणेची भीक मागायला उभा राहिलेला नाही, तर हे आत्मकथन वाचून संपल्यावर आपण देश, धर्म, संस्कृती,

समाज, सुधारणा, प्रबोधन वगैरे शब्द किती क्षुद्र मर्यादेच्या रिंगणात वापरत असतो याचाच पुन्हा एकदा अधिक तीव्रतेने प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही आणि आपले जगणे आपल्यालाच ओशाळवाणे वाटायला लागते.

संदर्भ :

१. मगर, सुदाम. *भोगवटा.* औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती : ऑगस्ट २०१७.

२. पवार, दया. *बलुतं.* मुंबई : ग्रंथाली प्रकाशन् प्रथमावृत्ती : डिसेंबर १९७८.

३. सोनकांबळे, प्र. ई. *आठवणींचे पक्षी.* औरंगाबाद : चेतना प्रकाशन, द्वितीय आवृत्ती : १९८१.

४. https://www.theblueeyedson.com/2020/10/vedaadhi-tu-hotas.html

५. https://www.sureshbhat.in/node/393